# जिल्हाधिकारीतथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१. Email :nandedrdc@gmail.com

**जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.- १३** **दिनांक. ११.०८.२०२०**

वाचाः- १) या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश, विस्तारित आदेश दिनांक २२.०५.२०२० दिनांक ३१.०५.२०२०, दिनांक ०४.०६.२०२०, दि. ०७.६.२०२०, दि. ८.६.२०२० दि. २६.०६.२०२० व दि. ३०.०६.२०२० दि.०७.०७.२०२०,दि. १०.०७.२०२०,दि.११.०७.२०२०, दि.१७.०७.२०२०, दि.१९.०७.२०२०, दि.२४.०७.२०२०, दि.३०.०७.२०२०, दि ०६.०८.२०२० व दि.०७.०८.२०२०

**विषयः** ताळेबंदी (Lockdown) कालावधीत नांदेड जिल्हयात आस्थापने / दुकानांच्या वेळा सुधारित करणेबाबत.(सकाळी ९.०० ते सायं ०७.००)

**आदेश**

ज्याअर्थी या कार्यालयाचे संदर्भ क्रमांक ०१ वरील आदेशान्वये नमूद आदेशान्वये नियमावलीसह दिनांक ३१/०७/२०२० पर्यंत नांदेड जिल्हयात नागरी, ग्रामीण व औद्योगिक क्षेत्रासाठी विविध अटी व शर्तीच्या अधिन राहून आस्थापना व दुकाने सकाळी ०७.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत चालू ठेवण्यास मुभा देण्यात आली होती.

आणि ज्याअर्थी साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ च्या मधील तरतूदीनुसार संदर्भात नमूद अधिसूचना दिनांक १४,मार्च २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे. तसेच फौजदारी प्रक्रिया दंड संहिता १९७३ नूसार मला प्रदान अधिकारान्वये मी डॉ.विपीन इटनकर (भा.प्र.से.) जिल्हादंडाधिकारी नांदेड, फौजदारी प्रक्रिया दंड संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(३) अन्वये या आदेशाव्दारे संदर्भात नमूद या कार्यालयाचे आदेश दिनांक १९.०७.२०२० मधील अटी व शर्ती जशास तसे लागू करून **(शनिवार,रविवार बंद) संपूर्ण नांदेड जिल्हयात दिनांक ११.०८.२०२० पासून पुढील आदेशापर्यंत आस्थापना, दुकानांच्या वेळा सकाळी ९.०० ते सायंकाळी ०७.०० पर्यंत चालू ठेवण्यास मुभा देण्यात येत आहे.**

सदर आदेशाची अंमलबजावणी करणाऱ्या सर्व अधिकारी यानी वरील नियमांची अमलबजावणी काटेकोरपणे, नियमाला धरून व मानवी दृष्टीकोणातुन करावी.

सदरील आदेशाचे पालन न करणा-या कोणतीही व्यक्ती,संस्था अथवा समुह हे साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि भारतीय दंड संहिता १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व कारवाई करण्यात येईल.

तसेच वरील आदेशाची अंमलबजावणी करीत असतांना सद्हेतुने केलेल्या कृत्यासाठी कुठल्याही अधिकारी व कर्मचारी यांचेवर विरुध्द कुठल्याही प्रकारची कायदेशिर कारवाई अथवा खटला दाखल करता येणार नाही.

हे आदेश दि. ११.०८.२०२० रोजी माझे सही शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात आली आहे.

COLLECTOR & DISTRICT MAGISTRATE NANDED Dist.

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी नांदेड.**

**प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर**

१. मा. अपर मुख्य सचिव,गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.
२. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद.

Scanned by TapScanner